खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## द्वितीय वर्ष वाणिज्य

## सत्र ३

## विषय

## कंपनी कायद्याचे घटक–I

## प्रकरण १

## कंपनी अधिनियम, २०१३: परिचय आणि कंपनीची संकल्पना

## प्रकरण 1

# कंपनी अधिनियम, २०१३ : परिचय आणि कंपनीची संकल्पना

**प्रस्तावना:**

३० ऑगस्ट २०१३ रोजी संयुक्त कायदेमंडळाने अंतिमतः दीर्घकाळ वाट पाहायला लावणाऱ्या २०१३ च्या कंपनी अधिनियमाला अधिसूचित केले.या अधिनियमाचे एकाच वेळेला सर्व कलमे अधिसूचित केली गेली नाहीत. पहिल्या टप्प्यामध्ये म्हणजे १२ सप्टेंबर २०१३ रोजी या अधिनियमाची ९८ कलमे शासनाने अधिसूचित केली. या अधिनियमाने भारतातील कॉर्पोरेट क्षेत्राचा सर्वांगीण पैलू म्हणून विचार केला.

## २०१३ च्या अधिनियमाची पार्श्वभूमी :

९८ कलमांच्या अंमलबजावणी सहित आणि १९५६ च्या अधिनियमाशी सुसंगती दर्शविणाऱ्या कलमांना रद्द करत, १२ सप्टेंबर २०१३ पासून हा कायदा अधिकाधिक परिणामकारक केला गेला. या कायद्याची पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

१ ) स्वयं नियमन वृद्धी :

२०१३ चा अधिनियम हा कंपनीच्या स्वयं नियमन वाढवण्यावरती भर देतो.तसेच या अधिनियमाने काही आधुनिक संकल्पना जसे की, एकल व्यक्ती कंपनी, लघु कंपनी, निष्क्रिय कंपनी यांचा परिचय करून दिला. त्याचप्रमाणे कंपनीच्या सामाजिक पर्यावरण विषयक, नैतिक दृष्टीने जबाबदार वर्तन वृद्धिंगत करण्यासाठी कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी या संकल्पनेचा देखील परिचय करून दिला.

२) अंकेक्षकांच्या जबाबदारीत वाढ :

त्याचप्रमाणे या कायद्याने गुंतवणूकदारांचे संरक्षण अधिक भक्कम करण्याचे उद्दिष्ट्य समोर ठेवले होते. त्याचप्रमाणे अंतर्गत व्यापार, मूल्य सूचकांक माहिती, समूह कृती तक्रार इत्यादींच्या सारख्या नवीन संज्ञांचा परिचय करून देऊन पारदर्शकता निर्माण करण्याचे एकच लक्ष्य समोर ठेवले. त्याचप्रमाणे या अधिनियमाने अंकेक्षकांची जबाबदारी अधिक प्रमाणात वाढवली आणि त्यांची भूमिका विस्तृत व्यापक केली

३) सीमापारीय संपादन-विलीनीकरण :

जलद गतीने होणाऱ्या जागतिकीकरणाची माहिती घेऊन सीमाबाह्य संपादन-विलीनीकरणाच्या तरतूदींची निर्मिती केली गेली.लघु कंपन्यात होणारे संपादन-विलिनीकरण

अनुदान नियंत्रण आणि काही विशिष्ट घटक यांच्यासाठीच्या या प्रक्रिया जलद मार्गाने किंवा रितीने केल्या जातील.

४ ) कॉर्पोरेट पर्यावरण निर्मिती :

२०१३ च्या कंपनी अधिनियमाने सहज आणि सोपे कॉर्पोरेट पर्यावरण निर्मिती, गुंतवणुकांना प्रबळ गुंतवणूक संरक्षण मिळावे म्हणून सुधारित आणि नवीन गुंतवणूक अटी यांचे ध्येय समोर ठेवले, असून त्याचबरोबर स्पर्धा निर्माण होण्यासाठी इतर अर्थव्यवस्थांसमोर साम्यदर्शक वैशिष्ट्यांसहित प्रतिमा उभारण्याचे देखील लक्ष्य ठेवलेआहे.

## <u>२०१३ च्या अधिनियमाची प्रमुख वैशिष्ट्ये :</u>

१) भागधारकांचे स्वातंत्र्य :

२०१३ च्या कंपनी अधिनियमाने भागधारकांना त्यांच्या हक्कांबद्दल अधिक माहितीक्षम करण्यासाठी आणि जास्त माहिती मिळविण्यासाठी समूह-कृती तक्रार यासारख्या नवीन संकल्पनांचा परिचय करून दिला.

२) भागधारकांचे वर्चस्व :

२०१३ च्या कंपनी अधिनियमाचे भागधारकांच्या विविध व वैशिष्ट्यपूर्ण विनिमयांच्या पैलूंवरती प्रामुख्याने भर दिलेला होता. या कायद्याने शासनाचा व्यवस्थापकीय मोबदल्या संदर्भात मंजुरी देण्याचा जो अधिकार होता, पर्यायाने कंपन्यांना शासनाच्या वरती अवलंबून रहावे लागत होते, या हक्कात कपात करून मर्यादेला मंजुरीदेण्याचे अधिकार भागधारकांना देऊन त्यांना सक्षम केले गेले.

३) कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी :

२०१३ च्या कंपनी अधिनियमान्वये विशिष्ट वर्गातील कंपन्यांना प्रत्येक वर्षी कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीशी संबंधित उपक्रमांवरती काही निश्चित रक्कम खर्च करणे बंधनकारक केले आहे. अर्थात, प्रत्येक वर्षी अशा उपक्रमांची अंमलबजावणी करताना काही अडचणी कदाचित येऊ शकतात; पण या उपाय-योजनेमुळे समाजातील जो मागास आणि विशेषाधिकार प्राप्त जो वर्ग आहे त्याची परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

४) जलद गती विलीनीकरण :

२०१३ च्या कंपनी अधिनियमाने विलीनीकरणासाठी जलद गती आणि सरळ प्रक्रिया सर्वांसमोर नमूद केली आणि त्याचप्रमाणे नियंत्रण आणि अनुदाने यांच्या बाबतची विशिष्ट वर्गातील कंपन्या आणि भारत सरकारचीमंजुरी मिळाल्यानंतर लघु कंपन्या यांच्या एकीकरणासाठी देखील जलदगती प्रक्रिया समोर आणली.

५) सीमापारीय विलीनीकरण :

२०१३ च्या कंपनी अधिनियमाने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पूर्वपरवानगीने सीमापारीय विलीनीकरण करण्याला परवानगी दिली आणि यामध्ये परकीय कंपन्या भारतीय कंपन्यांत विलीन होऊ शकतात. किंवा भारतीय कंपन्या परकीय कंपन्यांमध्ये विलीन होऊ शकतात.

६ ) भागधारकांच्या संख्येमध्ये वाढ :

२०१३ च्या कंपनी अधिनियमाद्वारे खासगी कंपन्यांमधील भागधारकांची संख्या ५० ते २०० करून भागधारकांच्यासंख्येत वाढ केली.

७ ) जास्तीतजास्त भागधारकांवरती मर्यादा :

कोणत्याही प्रकारच्या संघटनेमध्ये किंवा भागीदारीतील कंपनीमध्ये अधिनियमात नमूद केल्याप्रमाणे शंभरपेक्षा जास्त व्यक्ती भागीदार म्हणून असणार नाहीत. अर्थात हे बंधन वकील, लेखापाल, कंपनी सेक्रेटरी या व्यावसायिकांनी युक्त असणाऱ्या संघटना किंवा भागीदारांना नसेल. १९५६ च्या कंपनी अधिनियमानुसार ही व्यक्तींची किंवा भागीदारांची मर्यादा ही जास्तीतजास्त २० इतकी होती आणि कोणत्याही प्रकारच्या व्यावसायिकांना यातून सवलतदेण्यात आली नव्हती.

८ ) एकल व्यक्ती कंपनी :

२०१३ च्या कंपनी अधिनियमाने, खासगी कंपन्यांचा एक नवा प्रकार तयार केला. एकल व्यक्ती कंपनीमध्ये केवळ एक संचालक आणि एक भागधारक असणार. १९५६ च्या कंपनी अधिनियमामध्ये, खासगी कंपनी करिताकमीत कमी दोन भागधारक आणि दोन संचालक असणे गरजेचे होते.

९ ) इलेक्ट्रॉनिक माध्यमे :

२०१३ च्या कंपनी अधिनियमाने कंपनीच्या देखभाल आणि दस्तऐवज पर्यवेक्षणासाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या वापरा करिता व अन्य विविध प्रक्रियांकरिता 'ई-गव्हर्नन्स' ही संकल्पना समोर मांडली.

१०) स्वतंत्र संचालक :

२०१३ च्या कंपनी अधिनियमान्वये सर्व सूचीतील कंपन्यांचे कमीत कमी १/३ संचालक हे स्वतंत्र असले पाहिजेत. त्याचप्रमाणे इतर वर्गातील कंपन्या किंवा सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये केंद्र शासनाने विहित केल्याप्रमाणे स्वतंत्र संचालकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. कोणताही स्वतंत्र दिग्दर्शक हा पाच वर्षांच्या दोन याप्रमाणे सलग दहा वर्षांपेक्षा जास्त काळ पदावर राहू शकत नाही.

११) संचालक मंडळाच्या सभांच्या सूचना पुरवणे :

२०१३ च्या कंपनी अधिनियमान्वये संचालक मंडळाच्या सभांची कमीत कमी सात दिवस आधी सूचना देणे गरजेचे आहे.ही सूचना प्रत्येक संचालकाला त्याने कंपनीत नोंदणीकृत केलेल्या पत्त्यावरती कोणत्याही इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांतून पाठवला जातो.१९५६ च्या कंपनी अधिनियमात कंपनीद्वारे भरवण्यात येणाऱ्या सभांच्या सूचनेसंदर्भात कोणताही सूचना कालावधी विहित केला गेलेला नव्हता.

१२) संचालकांच्या कर्तव्याची निश्चिती :

२०१३ च्या कंपनीच्या अधिनियमानुसार संचालकांची कंपनी प्रतीची जी कर्तव्ये आहेत त्यांची निश्चिती केली होती.

## कंपनी-

कंपनी ही प्रामुख्याने व्यक्तींनी तयार झालेली अशी एक संस्था असते की, ज्यात त्या व्यक्ती करारामुळे किंवा सहकाराच्या कलमांमुळे एकत्रितरित्या बांधले गेले असतात. या सर्वांचा व्यावसायिक किंवा व्यापारी हेतू हा समान असतो. अशा या कंपन्या किंवा संस्था ज्या मान्यताप्राप्त असून नोंदणीकृत किंवा अनोंदणीकृत असूनसुद्धा, कोणत्या एका विशिष्ट अधिनियमाने तयार झालेल्या असतात. अधिनियमाद्वारे निर्मित या निगमांचे एक तत्त्व म्हणजे कायदेशीरदृष्ट्या त्यांना स्वतंत्र अस्तित्व असते. व त्याचप्रमाणे ज्या व्यक्तींनी मिळून ती कंपनी तयार झालेली असते त्यापासून वेगळी आणि कायदेशीर व्यक्ती असते. या निर्मिती मागे व्यवसायात हस्तांतरित भाग, मर्यादित जबाबदारी, विभिन्न नाव, प्रशासकीय मंडळ, वैधानिक दृष्टीने संघटन, कायदेशीर घटकांचे अस्तित्व यांच्यामार्फत नफा मिळवणे हा हेतू असतो.

**व्याख्या**

सामान्य उद्देशाच्या पूर्तीसाठी स्वेच्छेने एकत्रित झालेल्या व्यक्तींच्या समूहास कंपनी असे म्हणतात.

**१) १९५६ च्या भारतीय कंपनी कायद्यानुसार :**

भारतीय कंपनी कायदा १९५६ कलम ३(१) नुसार कंपनीची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येईल."कंपनी म्हणजे कंपनी कायद्याद्वारे स्थापन केलेली व नोंदवलेली अथवा अस्तित्वात असलेली कंपनी.'

**२) प्रा. हॅने:**

"कंपनी म्हणजे नफा मिळविण्यासाठी व्यक्तींनी स्थापन केलेली ऐच्छिक संघटना, या संघटनेचे भांडवल हस्तांतरक्षम भागात विभागलेले असते व भागांची मालकी ही सभासदत्वाची अट असते.'

**३) कायदेशीर व्याख्या :**

**"कृत्रिम व्यक्ती म्हणून जिची निर्मिती कायद्याने केलेली असते आणि जिला सर्वमान्य मुद्रा व सातत्यपूर्ण अस्तित्व असते अशी नोंदवलेली संघटना.**

## <u>कंपनीचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये :</u>

**१) नोंदविलेली ऐच्छिक संघटना :**

**कंपनीची स्थापना मुख्यत: व्यवसाय करून नफा मिळविण्याच्या हेतूने काही व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह एकत्र येऊन करतात. ही स्थापना पूर्णपणे ऐच्छिक स्वरूपाची असते, तसेच कंपनीची देशातील प्रचलित कायद्यान्वये नोंद केलेली असते.**

**२) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व (कृत्रिम व्यक्ती):**

**कंपनीला स्थापनेनंतर लगेच कायद्याच्या दृष्टीने स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्राप्त होते.कायदा कंपनीला स्वतंत्र व्यक्ती म्हणून मानतो.एखादी व्यक्ती जे जे करू शकेल ते ते कंपनी व्यवसाय चालवण्यासाठी करू शकते. कंपनीला शरीर, मन, आत्मा नसतो तरीसुद्धा ती करार करू शकते, स्वत:साठी नोकर नेमू शकते, मालमत्ता धारण करू शकते म्हणून तिला कायद्याने निर्माण केलेली कृत्रिम व्यक्ती म्हणतात. सभासदापासून कंपनीला वेगळे असे स्वतंत्र अस्तित्व असते.**

**३) कायमचे/सातत्यपूर्ण अस्तित्व :**

**कंपनीला सभासदापासून वेगळे असे स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झालेले असल्यामुळे तिला चिरंतन स्थैर्य प्राप्त होते.कंपनीचे अस्तित्व सभासदांच्या, संचालकांच्या किंवा कामगारांच्या अस्तित्वापेक्षा भिन्न असते.सभासदांची मानसिक अपात्रता, कर्जबाजारीपणा, निवृत्ती, नादारी किंवा मृत्यू याचा कंपनीच्या अस्तित्वावर कोणताच परिणाम होत नाही.सभासद किंवा संचालक येवोत अथवा जावोत कंपनीच्या अस्तित्वाचे चक्र अखंड फिरतच असते.**

**४) बोधचिन्ह (सर्वमान्य मुद्रा) :**

**कंपनीच्या अस्तित्वाची खूण म्हणून कंपनीचे बोधचिन्ह किंवा सर्वमान्य मुद्रा वापरली जाते. ज्याप्रमाणे एखादी जिवंत व्यक्ती आपले अस्तित्व दर्शविण्यासाठी स्वत:ची सही करते, त्याचप्रमाणे कंपनीचे अस्तित्व दर्शविण्यासाठी सर्व महत्त्वाच्या कागदपत्रावर तिची सर्वमान्य मुद्रा उमटवली जाते. ही सर्वमान्य मुद्रा अत्यंत महत्त्वाची असल्या कारणाने ती कंपनी चिटणीसाच्या ताब्यात असते. अधिकृतपणे कागदपत्र तयार केल्यानंतर सर्वमान्य मुद्रा उमटवली जाते व ही मुद्रा वैध आहे.**

५) भागभांडवल :

कंपनीला व्यवसाय करण्यासाठी भागभांडवलाची आवश्यकता असते.हे भांडवल भागांमध्ये विभागलेले असते.भागांची विक्री करून भागभांडवल जमा केले जाते.भागांची दर्शनी किंमत निश्चित केलेली असते. कंपनीचे भाग हस्तांतरित करता येतात. भागधारक त्याचे भाग दुसऱ्याला देऊ शकतो, विकू शकतो; परंतु भागांचे हस्तांतर करताना कंपनी नियमावलीने सांगितलेल्या पद्धतीचा अथवा कंपनी कायद्यातील भाग हस्तांतराबाबतच्या तरतुदींचा अवलंब करून करावा लागतो.

६) भागधारक हेच सभासद :

कंपनीत भाग धारण करणारे कंपनीचे सभासद बनतात, मालक होतात. कंपनीच्या कारभारावर त्यांचे नियंत्रण असते.सभासदांची प्रचंड संख्या व त्यांचे विखुरलेले स्वरूप, यामुळे ते नियंत्रण मर्यादित स्वरूपात असते. दरवर्षी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना कंपनीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याची संधी मिळते.

७) मर्यादित जबाबदारी :

कंपनीतील सभासदांची जबाबदारी मर्यादित स्वरूपाची असते. कंपनीच्या सभासदांची जबाबदारी त्यांनी धारण केलेल्या भागाच्या दर्शनी किमती इतकी किंवा त्यांच्या भागावर न दिलेल्या रकमेइतकी असते. एखाद्या सभासदाने त्याच्या भागांच्या दर्शनी किमतीइतकी रक्कम कंपनीला दिल्यानंतर तो कंपनीची देणी देण्यासाठी बिलकुल जबाबदार नसतो.

८) मालकी व व्यवस्थापन यामधील फारकत :

संयुक्त भांडवली कंपनीत असंख्य भागधारक असतात. हे भागधारक किंवा सभासद मोठ्या भौगोलिक क्षेत्रावर विखुरलेले असतात. या सर्व सभासदांना कंपनीच्या प्रशासनात स्वारस्य असतेच असे नाही, तसेच कंपनीचे प्रशासन करीत असताना वेगवेगळ्या कायद्यांची माहिती असावी लागते व ही माहिती सर्व सभासदांना असतेच असे नाही.

९) सभासद संख्या :

सार्वजनिक कंपनीची स्थापना करावयाची असल्यास किमान सात सभासद एकत्र येणे आवश्यक आहे.मात्र, सभासदांच्या कमाल संख्येवर कोणतेही बंधन नसते. खासगी कंपनीची स्थापना करावयाची असल्यास किमान दोन व्यक्ती एकत्र येणे आवश्यक आहे.मात्र, सभासदांची कमाल संख्या ५० इतकी असली पाहिजे.

१०) केंद्र सरकारचे नियंत्रण :

कंपनीच्या कारभारावर केंद्र सरकारचे नियंत्रण व देखरेख असते.समाजातील अनेक व्यक्तींनी कंपनीत भांडवलाच्या रूपाने पैसे गुंतविलेले असल्यामुळे कायद्याचे कंपनीवर काटेकोर नियंत्रण

असते. समाजाने गुंतविलेल्या पैशाचा विनियोग योग्य प्रकारे व कंपनीच्या हितासाठीच केला जातो की नाही, यादृष्टीने कायद्याचे बंधन कंपनीवर असते.

११) हिशेब तपासणी व प्रसिद्धी :

सार्वजनिक कंपनीने आपल्या आर्थिक वर्षातील सर्व हिशेब, जमा-खर्च कायद्याप्रमाणे तयार केले पाहिजे व त्याची प्रसिद्धी सभासद, कर्जरोखेधारक, गुंतवणूकदार, ठेवीदार तसेच हितसंबंधित व्यक्ती व संस्थांसाठी जाहीरपणे केली पाहिजे. कंपनीचे हिशेब व जमा-खर्च मान्यताप्राप्त अंकेक्षकाकडून तपासून घेणे आवश्यक आहे.

## कंपनीचे प्रकार :

**A)स्थापनेच्या आधारावर कंपनी :**

१) सरकारी सनदेने स्थापन झालेल्या कंपन्या :

या कंपन्यांची स्थापना राजाज्ञेनुसार केली जाते.त्यांची निर्मिती ज्याप्रमाणे राजाज्ञेनुसार होते त्याचप्रमाणे त्यांचे अधिकार, कार्यक्षेत्र व विसर्जनदेखील राजाज्ञेनुसार ठरते.स्थापना झाल्यानंतर अशा कंपन्या कायदेशीर व्यक्ती म्हणून सर्व प्रकारची कार्ये करू शकतात. या कंपन्यांच्या सभासदांची जबाबदारी मर्यादित असते.कंपन्यांच्या विसर्जनाबरोबरच कंपन्यांच्या सभासदाच्या जबाबदाऱ्याही संपुष्टात येतात. या कंपन्यांच्या नावाच्या शेवटी 'मर्यादित' हा शब्द लिहिण्याची आवश्यकता नसते.

२) विशेष कायद्याने स्थापन झालेल्या कंपन्या :

या कंपन्यांची स्थापना लोकसभा अगर विधानसभा यांनी केलेल्या स्वतंत्र कायद्यानुसार होत असते. विशेष कायद्यानुसार कंपन्यांची ध्येये, धोरणे, उद्दिष्टे, अधिकार, जबाबदाऱ्या, कर्तव्ये, कार्यक्षेत्र या सर्व बाबी नियंत्रित केल्या जातात. या कंपन्यांचे उद्दिष्ट नफा मिळविणे हे नसून सेवा-सुविधांचा पुरवठा करणे हे असते.भारतातील अशा कंपन्यांची उदाहरणे म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, अर्थपुरवठा महामंडळ उदा. IFCI, ICICI, UTI, IDBI इत्यादी राज्य व्यापार महामंडळ, इंडियन एअरलाईन्स, राष्ट्रीयीकृत बँका, आयुर्विमा महामंडळे (LIC) इत्यादी विशेष कायद्याने स्थापन झालेल्या कंपन्या होत.

३) नोंदविलेल्या कंपन्या :

देशातील प्रचलित कायद्यानुसार ज्या कंपन्यांची स्थापना होते त्या कंपन्यांना नोंदवलेल्या कंपन्या असे म्हणतात. भारतात १९५६ च्या भारतीय कंपनी कायद्यानुसार या कंपन्या नोंदणी अधिकाऱ्याकडे अथवा निबंधकाकडे नोंदवल्या जातात. भारतात संसदीय कंपन्या नसणाऱ्या सर्व कंपन्या नोंदवलेल्या कंपन्याच आहेत. १९५६ च्या कंपनी कायद्यातील तरतुदी या कंपन्यांना लागू होतात.

**B)जबाबदारी तत्त्वावर आधारित कंपनी :**

१) भागांनी मर्यादित कंपन्या :

ज्या कंपनीत भागभांडवल असते व सभासदांची जबाबदारी त्यांनी धारण केलेल्या भागांच्या दर्शनी किमतीइतकी किंवा त्यांच्या भागावर न दिलेल्या रकमेइतकी असते, त्या कंपनीला भागांनी मर्यादित कंपनी असे म्हणतात. भागांनी मर्यादित कंपनीत सभासदांची जबाबदारी जरी मर्यादित असली तरी ती त्यांना कंपनीच्या अस्तित्व काळात म्हणजेच कंपनी चालू असतानादेखील पार पाडावी लागते.

२) हमीने मर्यादित कंपन्या :

या कंपन्यांतील सभासदांची जबाबदारी त्यांनी दिलेल्या हमीच्या रकमेपुरती मर्यादित असते. ज्या कंपनीत सभासद कंपनीच्या विसर्जनाच्या वेळी तिची देणी देण्यासाठी काही निश्चित रक्कम देण्याची लेखी हमी देतात, त्या कंपनीला हमीने मर्यादित कंपनी असे म्हणतात. सभासदाने हमी द्यावयाच्या रकमेचा उल्लेख कंपनीच्या नियमावलीतील हमी विधानात केलेला असतो. हमीची रक्कम सर्व सभासदांसाठी सारखीच असते.व्यावसायिक संघटना, क्रीडा मंडळे, शाळा, हॉस्पिटल यांसारख्या संस्था बहुधा हमी कंपन्या म्हणून स्थापन केल्या जातात.

३) अमर्यादित कंपन्या:

या कंपन्यांतील सभासदांची जबाबदारी अमर्यादित असते. म्हणजेच कंपनीची देणी देण्यास कंपनीची मालमत्ता जर अपुरी असेल, तर सभासदाच्या खासगी अगर वैयक्तिक मालमत्ता देणी देण्यासाठी वापरल्या जातात. मात्र, अमर्यादित जबाबदारीचे हे ओझे सभासदांना फक्त कंपनीच्या विसर्जनाच्या वेळीच वागवावे लागते. अमर्यादित कंपनी व भागीदारी संस्था यांमध्ये अमर्यादित जबादारी हे.महत्त्वाचे साम्य स्थळ आहे; परंतु या दोन्हीत महत्त्वाचा फरकही आहे.

**C) सभासद संख्येच्या आधारावर कंपनी :**

१) खासगी कंपन्या :

भारतीय कंपनी कायदा १९५६ च्या कलम ३(१) नुसार, खासगी कंपनीची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. 'खासगी कंपनी म्हणजे अशी कंपनी की जी आपल्या नियमावलीने, i) सभासदांच्या भागांच्या मुक्त हस्तांतरणावर निर्बंध घालते. ii) सभासदांची संख्या (सेवक सोडून) ५० पर्यंत मर्यादित करते

२) सार्वजनिक कंपन्या :

कंपनी कायद्याने सार्वजनिक कंपनीची व्याख्या केलेली नाही; परंतु जी कंपनी खासगी नाही ती सार्वजनिक कंपनी असे कायद्यात म्हटले आहे.

**D)नियंत्रणाच्या आधारावर कंपनी :**

१) संचालक मंडळावर नियंत्रण असणारी कंपनी :

कायद्याच्या कलम ४(२) अन्वये ज्यावेळी एखाद्या कंपनीच्या संचालक मंडळावर दुसऱ्या कंपनीचे नियंत्रण असते त्यावेळी त्या कंपनीस दुय्यम कंपनी असे म्हटले जाते तर नियंत्रण ठेवणाऱ्या कंपनीला प्रमुख कंपनी असे म्हटले जाते. अशी प्रमुख कंपनी आपल्या व्यक्तींची दुसऱ्या कंपनीच्या संचालक मंडळावर संचालक म्हणून नियुक्ती करू शकते.

२) बहुसंख्य भागधारण करणारी कंपनी :

जी कंपनी दुसऱ्या कंपनीत निम्म्यापेक्षा (५०% पेक्षा जास्त) अधिक भागभांडवल धारण करून त्या कंपनीवर नियंत्रण ठेवते. तिला 'प्रमुख कंपनी' असे म्हणतात आणि प्रमुख कंपनी ज्या कंपनीवर नियंत्रण ठेवते त्या कंपनीला 'दुय्यम कंपनी' असे म्हणतात. या प्रकारात सूत्रधार/प्रमुख कंपनी दुसऱ्या कंपनीचे ५०% पेक्षा जास्त सामान्य भांडवल खरेदी करते. भागभांडवलाचा बराच मोठा भाग सूत्रधार कंपनीच्या मालकीचा असल्याने ती दुसऱ्या कंपनीवर (दुय्यम) नियत्रंण ठेवू शकते.

३) दुय्यम कंपनीची दुसरी दुय्यम कंपनी :

कंपनी कायद्याच्या कलम ४(१) (सी) अन्वये जर एखादी कंपनी दुय्यम कंपनीची दुय्यम कंपनी असेल तर ती प्रमुख कंपनीचीही दुय्यम कंपनी बनते. उदा. 'ब' कंपनी जर 'अ' कंपनीची दुय्यम कंपनी असेल आणि 'क' कंपनी जर 'ब' कंपनीची दुय्यम कंपनी असेल तर 'क' कंपनी 'अ' कंपनीचीही दुय्यम कंपनी बनते. त्याचप्रमाणे जर 'ड' ही कंपनी 'क' या कंपनीची दुय्यम कंपनी असेल तर " ही कंपनी 'ब' कंपनी तसेच 'अ' कंपनीची दुय्यम कंपनी बनते.

**<u>खासगी कंपन्यांची वैशिष्ट्ये:</u>**

१) सभासद संख्या :

खासगी कंपनी स्थापन करण्यासाठी कमीत कमी २ (दोन) सभासद आवश्यक असतात, तर तिची सभासद संख्या ५० पेक्षा जास्त असू शकत नाही.यामध्ये नोकर भागधारकांचा समावेश करण्यात येत नाही.

२) भागांचे हस्तांतर :

खासगी कंपनीतील सभासद कंपनीतील त्यांचे भाग कोणालाही, केव्हाही व कोणत्याही किमतीला विकू शकत नाहीत. खासगी कंपनीला भागांचे हस्तांतर संचालक मंडळ सांगेल त्याला व ठरवतील त्या किमतीला करावे लागते.

३) भाग व कर्जरोखे विक्री :

खासगी कंपनी आपले भाग व कर्जरोखे माहितीपत्रक प्रसिद्ध करून किंवा इतर मार्गांनी जनतेला आवाहन करून सार्वजनिकरीत्या विकू शकत नाही.खासगी कंपनीला तिचे भाग व कर्जरोखे खासगीरीत्याच विकता येतात.

४) संचालक संख्या :

खासगी कंपनीला कमीत कमी दोन संचालक असतात. त्यांनी आळीपाळीने निवृत्त व्हावे, अशी अट नाही. सर्वांची नेमणूक एका ठरावाने करता येते.

५) व्यवसाय प्रारंभ :

खासगी कंपनीला नोंदणी दाखला मिळाल्याबरोबर व्यवसाय सुरू करता येतो. व्यवसाय प्रारंभ दाखल्याची खासगी कंपनीला गरज भासत नाही.

**<u>खाजगी मर्यादित कंपनीचे फायदे आणि मर्यादा :</u>**

**A) खाजगी मर्यादित कंपनीचे फायदे :**

I) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व :

अस्तित्वाचा अर्थ असा आहे की, ज्याचे वास्तविक अस्तित्व असते. एक कंपनी एक कायदेशीर संस्था आ आणि कायद्यानुसार स्थापित न्यायिक व्यक्ती आहे. न्यायिक व्यक्ती अशी व्यक्ती असते जी नैसर्गिक व्यक्त किंवा मनुष्य नसते. म्हणून कंपनीच्या स्वरूपात व्यापक कायदेशीर क्षमता असते आणि मालमत्ता देखील त्याच्या मालकीची असू शकते आणि कर्ज देखील घेतले जाऊ शकते. अशा कर्जासाठी कंपनीच्या सभासदांच (भागधारक/ संचालक) कंपनीच्या लेनदारांवर कोणतेही उत्तरदायित्व नसते. म्हणूनच, खाजगी मर्यादित कंपनीही एक कायदेशीर संस्था आहे जी तिच्या सदस्यापेक्षा वेगळी असते.

ii) अखंड अस्तित्व :

खाजगी कंपनीचे 'कायमचे वारसाहक्क' असते, जे कायदेशीररित्या विसर्जित होईपर्यंत चालू असते किंवा त्याचे अविरत अस्तित्व असते.एखादी कंपनी स्वतंत्र कायदेशीर व्यक्ती असल्याने कोणत्याही सदस्याच्या मृत्यूमुळे किंवा इतर निघून जाण्याने त्याचा परिणाम होत नाही. कायमचे वारसा हक्क किंवा अखंड अस्तित्व कंपनीचे
सर्वात महत्वाची वैशिष्ट्ये आहेत.

iii) मर्यादित दायित्व :

मर्यादित दायित्व म्हणजे केवळ एखाद्या कंपनीच्या कर्जात मर्यादित प्रमाणात कायदेशीररित्या जबाबदार राहण्याची स्थिती, मालकी हक्क आणि भागीदारी विपरीत मर्यादित

दायित्व कंपनीत, कंपनीच्या कर्जाच्या बाबतीत सदस्यांचे उत्तरदायित्व मर्यादित असते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर एखाद्या कंपनीच्या सदस्यांचे दायित्व फक्त त्यांनी घेतलेल्या समभागांच्या किंमतीच्या मर्यादेपर्यंत मर्यादित असते. म्हणूनच, जिथे एखादी कंपनी शेअर्सद्वारे मर्यादित असते, तिथे वाइंड-अपवर असलेल्या सदस्यांचे उत्तरदायित्व त्यांच्या समभागांवरील न भरलेल्या रकमेपर्यंत मर्यादित असते.

**iv) समभागांची विनामूल्य व सुलभ हस्तांतरण :**

शेअर्सद्वारे मर्यादित कंपनीचे शेअर्स कोणत्याही अन्य व्यक्ती समभागधारकाद्वारे हस्तांतरणीय असतात. मालकीची चिंता किंवा भागीदारी म्हणून चालणाऱ्या व्यवसायातील व्याज हस्तांतरणाच्या तुलनेत हस्तांतरण सोपे आहे. शेअर्स हस्तांतरण फॉर्म भरणे आणि त्यावर स्वाक्षरी करणे आणि समभाग खरेदीदारास समभाग प्रमाणपत्रांसह हस्तांतरित करणे सहजपणे होऊ शकते.

**v) मालमत्तेची मालकी :**

एखादी कंपनी न्यायिक व्यक्ती म्हणून मालमत्ता स्वतःच्या नावावर किंवा स्वतःच्या मालकीची करून घेऊ शकते, जोपर्यंत कंपनी चिंताजनक आहे तोपर्यंत कोणताही भागधारक कंपनीच्या मालमत्तेवर कोणताही दावा करु शकत नाही. भागधारक कंपनीच्या मालमत्तेचे मालक नसतात तर कंपनी स्वतःच एक मालक असते.

**B)खासगी मर्यादित कंपनीच्या मर्यादा :**

**i) नोंदणी प्रक्रिया:**

खासगी मर्यादित कंपनीच्या नोंदणीसाठी सरासरी सुमारे १०-२० दिवस लागतात. १३,००० रुपये घेतात. म्हणूनच, एका खाजगी मर्यादित कंपनीची नोंदणी करण्यात एक प्रक्रिया आणि खर्चाचा समावेश आहे जे मालकी नसलेल्या नोंदणीकृत घटकास लागू होत नाही.

**ii) अनुपालन औपचारिकता:**

एका खाजगी मर्यादित कंपनीला अनेक पोस्ट अनुपालन आवश्यक असतात. सर्व कंपन्यांना बोर्डाच्या बैठका घेणे, सर्वसाधारण सभा घेणे, खात्यांचे लेखापरीक्षण करणे, वैधानिक रजिस्टर ठेवणे आणि प्रत्येक वर्षी कॉर्पोरेट अफेयर्स मंत्रालयाकडे वार्षिक परतावा भरणे आवश्यक असते. कॉर्पोरेट अनुपालन औपचारिकता व्यतिरिक्त, कंपनीला कर आणि कामगार कायद्यांचे पालन देखील करावे लागेल जे व्यवसायाच्या अस्तित्वाच्या प्रकाराकडे दुर्लक्ष करून लागू असतील.

**iii) मालकी विभाग**

खासगी मर्यादित कंपनीचा एक मोठा गैरफायदा म्हणजे संचालक आणि भागधारक म्हणून काम करण्यासाठी किमान दोन व्यक्तींची आवश्यकता असते.तर, एखादा एकमेव उद्योजक ज्याला

स्वतः हून व्यवसाय सुरू करण्याची आणि हाताळण्याची इच्छा असेल तर ती व्यक्ती खासगी मर्यादित कंपनी सुरू करू शकत नाही.

**<u>सार्वजनिक कंपनीची वैशिष्ट्ये :</u>**

कंपनी कायद्याने सार्वजनिक कंपनीची व्याख्या केलेली नाही; परंतु जी कंपनी खासगी नाही ती सार्वजनिक कंपनी असे कायद्यात म्हटले आहे.

१ ) सभासद संख्या:

सार्वजनिक कंपनी स्थापन करण्यासाठी कमीत कमी ७ (सात) सभासद आवश्यक असतात. (ही सभासद संख्या स्थापनेपासून विसर्जनापर्यंत असावी लागते.) तर कमाल संख्येवर कोणतीही मर्यादा नाही

२ )भागांचे हस्तांतर:

सार्वजनिक कंपनीतील सभासद आपल्या भागाचे मुक्तपणे हस्तांतर करू शकतात, तसेच जर भागांची नोंद भागबाजारात झाली असेल, तर सभासद आपले भाग भागबाजारात केव्हाही विकू शकतात.

३ ) भाग व कर्जरोखे विक्री :

सार्वजनिक कंपनी आपले माहितीपत्रक प्रसिद्ध करून किंवा इतर अन्य मार्गांनी जनतेला आवाहन करून आपल्या भागांची व कर्जरोख्याची विक्री सार्वजनिकरीत्या करू शकते.

४ ) संचालक संख्या :

सार्वजनिक कंपनीत कमीत कमी ३(तीन) संचालक असतात. संचालकांनी आळीपाळीने निवृत्त व्हावे लागते. एकूण संचालक संख्येच्या १/३ इतके संचालक प्रत्येक वर्षी निवृत्त झाले पाहिजेत, असे कायदेशीर बंधन आहे.

५ ) व्यवसाय प्रारंभ :

सार्वजनिक कंपनीला नोंदणी दाखला नोंदणी अधिकाऱ्याकडून मिळाल्यानंतर व्यवसायास प्रारंभ करता येत नाही. त्यासाठी सार्वजनिक कंपनीला व्यवसाय प्रारंभ दाखला मिळवावा लागतो आणि हा व्यवसाय प्रारंभ दाखला मिळाल्यानंतर व्यवसायास प्रारंभ करता येतो.

## सार्वजनिक मर्यादित कंपनीचे फायदे आणि मर्यादा

### A) सार्वजनिक मर्यादित कंपनीचे फायदे

सार्वजनिक मर्यादित कंपनीची विशिष्ट वैशिष्ट्ये देखील आहेत, त्यातील बऱ्याच गोष्टी एकमेकांना मजबुती देतात, ज्यामुळे त्यास काही वेगळे फायदे मिळतात.

१ ) सार्वजनिक समभागांद्वारे भांडवल उभे करणे :

सार्वजनिक मर्यादित कंपनी असण्याचा सर्वात मुख्य फायदा म्हणजे भागभांडवल वाढवण्याची क्षमता, विशेषतः जेथे कंपनी मान्यता प्राप्त एक्सचेंजवर सूचीबद्ध आहे. ते आपले शेअर्स जनतेला विकू शकतात आणि कोणीही पैसे गुंतविण्यास सक्षम असू शकतात, म्हणून भांडवल उभे केले जाऊ शकते जे सामान्यतः खासगी मर्यादित कंपनीपेक्षा बरेच मोठे असते.

२ ) प्रतिष्ठित प्रोफाइल आणि आत्मविश्वास :

पात्र असो वा नसो, कंपनीच्या नावाच्या शेवटी 'पीएलसी' असणे स्थायी आणि प्रतिष्ठा वाढवू शकते. अधिक स्थापित, मोठे किंवा अधिक शक्तिशाली असण्याची ही कल्पना ग्राहक, पुरवठा करणारे आणि कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर परिणाम करू शकते. कंपनी सार्वजनिक असल्यास विशेषत: स्टॉक एक्सचेंजमध्ये सूचीबद्ध असल्यास अधिक लोकांना माहित होईल.

३ ) समभागांचे (शेअर्स) हस्तांतरण :

सार्वजनिक मर्यादित कंपनीचे शेअर्स खाजगी समकक्षापेक्षा अधिक सहजपणे हस्तांतरणीय असतात, म्हणजे भागधारकांना तरलतेचा फायदा होतो. समभागांना स्टॉक एक्स्चेंजवर कोट केल्यास, भागधारक आणि संभाव्य भागधारकांना साधारणपणे कंपनीत समभाग हस्तांतरित करणे सोपे होईल - जरी बाजार अद्याप इच्छुक खरेदीदार आणि विक्रेते उपलब्ध असण्यावर अवलंबून आहे.

### B) सार्वजनिक मर्यादित कंपनीच्या मर्यादा :

१ ) अधिक नियामक आवश्यकता :

भागधारकांचे संरक्षण करण्यासाठी, सार्वजनिक मर्यादित कंपनीसाठी कायदेशीर आणि नियामक आवश्यकता खाजगी मर्यादित कंपन्यापेक्षा अधिक कठोर आहेत. उदाहरणार्थ, कंपनी व्यापार करण्यापूर्वी कंपनी हाऊसकडून ट्रेडिंग प्रमाणपत्र घेणे आवश्यक.संचालकांना कर्जासंबंधी अधिक कठोर नियम लागू होतात.जर कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध असतील तर कंपनीला बाजाराचे नियमही पाळणे आवश्यक आहे.

२ ) पारदर्शकतेची उच्चपातळी आवश्यक :

सार्वजनिक कंपन्यांकरिता पारदर्शकतेची उच्चपातळी आवश्यक असते. तसेच त्याच्या खात्यांचे लेखापरीक्षण करण्याची आवश्यकता असल्यास, सार्वजनिक मर्यादित कंपन्या सहसा संक्षिप्त खाती दाखल करण्यास असमर्थ असतात, तर लहान खाजगी कंपन्या सहसा असे करू शकतात.

३ ) मालकी आणि नियंत्रण समस्या :

सार्वजनिक मर्यादित कंपनीसह, कंपनीचा भागधारक कोण आहे आणि नियंत्रक शेवटी जबाबदार आहेत हे नियंत्रित करणे खूप कठीण आहे. म्हणूनच अशी शक्यता आहे की मूळ मालक किंवा संचालक कंपनीच्या दिशेने असलेले नियंत्रण गमावू शकतात. व्यवस्थापन करण्यास अधिक वेळ घालवू शकतात.

## खासगी कंपनी आणि सार्वजनिक कंपनी यातील फरक

| अ.क्र | फरकाचे मुद्दे | खासगी कंपनी | सार्वजनिक कंपनी |
|---|---|---|---|
| 1 | भागधारकांची किमान व कमाल मर्यादा | कमीत कमी २ जास्तीत जास्त ५० कितीही | किमान ७ व कमाल मर्यादा कितीही |
| 2 | भाग हस्तांतर | निर्बंध | मुक्तपणे |
| 3 | व्यवसायाचा प्रारंभ | नोंदणी दाखला मिळाल्यावर | व्यापार सुरु करण्याचे प्रमाणपत्र मिळाल्यावर |
| 4 | उद्देशपत्रकाचे वाटप | भांडवल मिळवण्यासाठी उद्देशपत्र प्रसिद्ध करता येत नाही | प्रसिद्ध करता येते |
| 5 | नियामक सभा | गरज नाही | बंधनकारक आहे |
| 6 | किमान भांडवल | बंधन नाही | बंधनकारक आहे |
| 7 | जाहीर निमंत्रण | भाग विक्री साठी जनतेला जाहीर निमंत्रण नाही | जाहीर निमंत्रण देता येते |
| 8 | विशिष्ट शब्दांचा उपयोग | खाजगी मर्यादित | मर्यादित |
| 9 | संचालक संख्या | किमान 2 | किमान ३ |
| 10 | संचालकांची लेखी संमती | बंधनकारक नाही | बंधनकारक आहे |
| 11 | भागअधिपत्रे | देऊ शकत नाही | देण्याचे अधिकार |
| 12 | विशेष सवलती | सवलती आहे, व्यवस्थापकीय खर्चवर बंधन नाही | सवलती नाही,व्यवस्थापकीय खर्च ५०००० रुपये पर्यंत |
| 13 | संचालकांची यादी व संख्येवरील मर्यादा | यादी अधिकाऱ्याला कळवण्याची गरज नाही आणि कितीही कंपनीत संचालक म्हणून कार्य यादी | यादी अधिकाऱ्याला देणे सक्तीचे आणि जास्तीत जास्त २० कंपन्यांमध्ये संचालक पद |

## खासगी कंपनीचे सार्वजनिक कंपनीमध्ये रूपांतरण

खासगी कंपनीचे रूपांतर सार्वजनिक कंपनीत केव्हाही करता येते. असे रूपांतर पुढील दोन प्रकाराने करता येते.

**अ) स्वेच्छेने किंवा विचारपूर्वक होणारे रूपांतर**

खासगी कंपनीला स्वेच्छेने किंवा विचारपूर्वक जर सार्वजनिक कंपनीत रूपांतर करावयाचे असल्यास खासगी कंपनीला पुढील प्रक्रिया पूर्ण करावी लागते.

१) संचालक मंडळाची सभा बोलविणे :

खासगी कंपनीचे सार्वजनिक कंपनीत रूपांतर करण्याची योजना तयार करण्यासाठी व ती योजना संमत करण्यासाठी, तसेच त्या योजनेला सभासदांची संमती घेण्यासाठी सभासदांची सभा बोलविण्यासाठी प्रथमतः कंपनीच्या संचालक मंडळाची सभा आयोजित करावी लागते.

२) घटनापत्रकात बदल करणे :

खासगी कंपनीला रूपांतरासाठी आपल्या घटनापत्रकात बदल करावा लागतो. कारण घटनापत्रकातील जबाबदारी विधानात बदल होत असल्यामुळे त्यासाठी कंपनीला विशेष ठराव संमत करावा लागतो.

३) नियमावलीत बदल करणे :

खासगी कंपनीला रूपांतरासाठी आपल्या नियमावलीत बदल करावा लागतो अथवा नियमावलीत योग्य ती दुरुस्ती करावी लागते अथवा नवीन नियमावली तयार करावी लागते. रूपांतरासाठी प्रामुख्याने अस्तित्वात असलेल्या नियमावलीतील पुढील तीन तरतुदी वगळणे आवश्यक असते. i) सभासदाच्या कमाल संख्येवरील (५० सभासदांवरील) बंधन. ii) भागहस्तांतरावरील बंधन. iii) भाग/कर्जरोखे विक्रीसाठी करावयाच्या जाहीर आव्हानावरील बंधन.

४) विशेष सभा बोलविणे :

खासगी कंपनीच्या सभासदांची कंपनी रूपांतरला मान्यता घेण्यासाठी सभासदांची विशेष सभा बोलवावी लागते. या सभेत सभासद पुढील तीन ठराव संमत करतात.

i) खासगी कंपनीचे सार्वजनिक कंपनीत रूपांतर करण्यासंबंधीचा ठराव.

ii) नियमावलीत योग्य ते बदल करण्यासंबंधीचा ठराव.

iii) भागभांडवलात वाढ करण्यासंबंधीचा ठराव.

५) नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंद करणे:

सभासदांच्या विशेष सभेत संमत झालेल्या ठरावाची नोंद योग्य त्या दस्ताऐवजासहीत कंपनीने नोंदणी अधिकाऱ्याकडे करावी लागते. त्यानंतर नोंदणी अधिकारी सर्व दस्तऐवजाची तपासणी करून रूपांतरित कंपनीला नवीन नावाने नोंदणीदाखला देतो.
वरील प्रमुख टप्पे पूर्ण केल्यानंतर खासगी कंपनीचे सार्वजनिक कंपनीत रूपांतर होऊ शकते.

**ब) कायद्यामुळे किंवा आपोआप होणारे रूपांतर :**

१९७४ च्या कंपनी दुरुस्त कायद्यानुसार खालील घटनांमुळे/कारणांमुळे खासगी कंपनीचे रूपांतर सार्वजनिक कंपनीत होते किंवा खासगी कंपनीलाच सार्वजनिक कंपनी म्हणून मानण्यात येते.

१) जर एखाद्या खासगी कंपनीतील वसूल भांडवलाच्या २५% पेक्षा जास्त भांडवल सार्वजनिक कंपनीने किंवा इतर कंपन्यांनी खरेदी केलेले असेल तर,

२) जर एखाद्या सार्वजनिक कंपनीच्या वसूल भांडवलाच्या २५% पेक्षा जास्त भांडवल खासगी कंपनीने विकत घेतलेले असेल तर,

३) जर एखाद्या खासगी कंपनीची मागील सलग तीन वर्षांतील वार्षिक सरासरी विक्री एक कोटी रुपयापेक्षा अधिक झालेली असेल तर, वरील सर्व घटनांमुळे खासगी कंपनीला सार्वजनिक कंपनी मानण्यात येते.

## <u>सार्वजनिक कंपनीचे खासगी कंपनीमध्ये रूपांतरण</u>

सार्वजनिक कंपनीचे खासगी कंपनीत रूपांतर करण्यासाठी पुढील प्रक्रिया पूर्ण करावी लागते :

१) संचालक मंडळाची सभा घेणे :

सार्वजनिक कंपन्यांच्या रूपांतराची योजना तयार करण्यासाठी व त्या योजनेला सभासदांची मान्यता घेण्यासाठी सभासदांची सभा केव्हा बोलवावी, याबाबत विचारविनमय करण्यासाठी संचालक मंडळाची सभा आयोजित करावी लागते. या सभेत पुढील दोन ठराव संमत केले जातात.
अ) कंपनी रूपांतराबाबतचा ठराव, ब) सभासदांची सभा आयोजित करण्याबाबतचा ठराव

२) विशेष सभा बोलविणे :

संचालक मंडळाने संमत केलेल्या ठरावानुसार सभासदांची रूपांतराला मान्यता घेण्यासाठी सभासदांची सभा बोलविली जाते. या विशेष सभेत विशेष स्वरूपाचे कामकाज होत असल्यामुळे सभासदांना त्यासबंधी पुढील विशेष ठराव संमत करावे लागतात : अ) कंपनी रूपांतराचा ठराव. ब) कंपनी नियमावलीत बदल करण्यासबंधीचा ठराव. क) कंपनी घटनापत्रकातील बदल करण्यासबंधीचा ठराव.

३) नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंद करणे :

सभासदांच्या सभेत संमत झालेल्या प्रत्येक ठरावाची एक प्रत बदललेल्या दस्तऐवजासहित नोंदणीसाठी नोंदणी अधिकाऱ्याकडे ३० दिवसांच्या आत पाठवावी लागते.

४) केंद्र सरकारची संमती घेणे :

सभासदांच्या सभेत संमत झालेल्या ठरावाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत कंपनी रूपांतराबाबत केंद्र सरकारची संमती कंपनीला घ्यावी लागते. त्यासाठी कंपनीला रूपांतराचा अर्ज करावा लागतो व त्यासोबत रूपांतराबाबतचे निवेदन सादर करावे लागते. आलेल्या अर्जाची शहानिशा करून केंद्र सरकार रूपांतराबाबत संमती देतात.

## कंपनी अधिनियम, २०१३ नुसार कंपन्यांचे होणारे प्रकार

कंपनी अधिनियम, २०१३ नुसार कंपन्यांचे होणारे प्रकार पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील :

१ ) सरकारी कंपन्या :

भारतीय कंपनी कायदा १९५६ च्या कलम ६१७ नुसार सरकारी कंपन्या म्हणजे अशा कंपन्या की ज्यामध्ये ५१% पेक्षा अधिक वसूल भागभांडवल केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा दोन्ही सरकारांनी मिळून धारण केलेले असते. त्या कंपनीला सरकारी कंपनी म्हणून ओळखले जाते. या कंपनीचे उरलेले भाग लोकांनी अथवा संस्थांनी घेतलेले असतात. सरकारी कंपन्यांच्या हिशेब तपासणीबाबत सरकारला विशेष अधिकार असतात.सरकारी कंपनी खासगी किंवा सार्वजनिक असू शकते. अशोक हॉटेल, हिंदुस्थान मशीन टुल्स, भारत इलेक्ट्रॉनिक्स, इंडियन टेलिफोन्स इत्यादी सरकारी मालकीचे व्यवसाय सरकारी कंपन्यांची उदाहरणे म्हणून सांगता येतील.

२ ) परदेशी कंपन्या :

"परदेशी कंपनी म्हणजे जिची नोंदणी भारताबाहेर झालेली आहे, तसेच १९५६ च्या अगोदर किंवा नंतर ज्या कंपनीचे व्यवसायाचे ठिकाण भारतात आहे अशी कंपनी." परदेशी कंपनीच्या व्याख्येवरून परदेशी कंपनीची पुढील दोन वैशिष्ट्ये आढळतात. १) या कंपनीची स्थापना परकीय कायद्यानुसार होते. २) परंतु व्यवसायाचे ठिकाण भारतात असते.

३ ) निर्मिती कंपन्या :

डॉ. व्ही. के. अलग समितीच्या शिफारशीनुसार कंपनी दुरुस्त कायदा २००२ मध्ये निर्मिती कंपनीबाबत महत्त्वपूर्ण तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे.

I) सभासदत्व केवळ व्यक्तीलाच मिळू शकते. II) सभासदत्व निर्मिती संस्थांना मिळू शकते.

III) ज्या व्यक्तीचे हितसंबंध निर्मिती कंपनीत गुंतलेले नाहीत, अशाच व्यक्तीला सभासदत्व मिळू शकते. Iv) निर्मिती कंपनीच्या व्यवसायास बाधा आणणाऱ्या कोणत्याही सभासदाचे सभासदत्व रद्द होऊ शकते. निर्मिती कंपनीचे सभासद हे निर्मिती कंपनीचे मालक असतात. सभासद जरी मालक

असले तरी निर्मिती कंपनीचे प्रशासन कंपनीच्या सभासदांनी निवडून दिलेल्या संचालकांमार्फत केले जाते. निर्मिती कंपनीचे संचालक हे सभासदांना जबाबदार असतात. प्रत्येक निर्मिती कंपनीत किमान ५ व जास्तीत जास्त १५ संचालक असावेत.

४ ) एकल व्यक्ती कंपनी :

एकल व्यक्ती कंपनी म्हणजे ज्या कंपनीचा केवळ एकच सदस्य असतो. तो संपूर्णतः व्यक्तिगत स्वरूपात असतो. एकल व्यक्ती कंपनीमध्ये तो एक सदस्य हाच सर्वाधिकारी किंवा संपूर्ण सदस्य असतो. अशा एकच सदस्य असणाऱ्या कंपनीच्या निवेदनपत्रकामध्ये कायदेशीर बाबींच्या दृष्टिकोनातून सद्य स्थितीत कार्यरत असणाऱ्या सदस्याच्या मृत्यूनंतर किंवा अकार्यक्षमतेनंतर कोण व्यक्ती, सर्वाधिकारी होणार त्याचे नाव असणे गरजेचे आहे.

५ ) निष्क्रिय कंपनी :

२०१३ च्या कंपनी अधिनियमानुसारच्या कलम ४५५ नुसार ज्या कंपनीची निर्मिती आणि नोंदणी ही या कायद्याप्रमाणे भविष्यकालीन प्रकल्पांसाठीची धारण केलेली मत्ता किंवा बौद्धिक संपदा स्वरूपात होते आणि या कंपनीकडून कोणत्याही प्रकारचे महत्त्वपूर्ण खात्यांवरील व्यवहार होत नाहीत, अशी कंपनी किंवा आकृतीशील कंपनी, अशा स्वरूपातील कंपनीचा दर्जा मिळावा म्हणून या कायद्याच्या विहित अटींप्रमाणे नोंदणी करू शकते. म्हणूनच निष्क्रिय कंपनी ही २०१३ च्या कंपनी अधिनियमाची एक नवीन संकल्पना आहे.

६ ) लघू कंपनी :

२०१३ च्या कंपनी अधिनियमाने पहिल्यांदा “लघू कंपनी” या संकल्पनेचा परिचय करून दिला.i) देय स्वरूपातील भाग भांडवल हे ५० लाखांपेक्षा अतिरिक्त असणार नाही, किंवा अधिनियमात नमूद केल्याप्रमाणे अशी उच्च रक्कम ५ कोटींपेक्षा जास्त असणार नाही. ii) या कंपनीची उलाढाल मागील नफा आणि तोटा खात्याप्रमाणे २ कोटींपेक्षा जास्त असणार नाही किंवा अशी अधिकतम रक्कम जी विहित केल्याप्रमाणे २० कोटींपेक्षा जास्त असणार नाही.

७ ) सेवाभावी संस्था (कलम ८ कंपनी):

व्यापार आणि व्यापार करून नफा मिळवण्याचे उद्दिष्ट सर्व कंपन्यांचे नसते. बऱ्याच कंपन्यांचे प्रामुख्याने सेवाभावी आणि ना-नफा उद्दीष्टे असतात. अशा संस्थांना विभाग ८ कंपनी म्हणून संबोधले जाते कारण त्यांना कंपनी अधिनियम, २०१० च्या कलम ८ अंतर्गत मान्यता मिळाली आहे. या कंपन्या त्यांचे उद्दीष्ट साध्य करण्याकरिता त्यांचे सर्व उत्पन्न आणि नफा समर्पित करतात.

८ ) सूचीबद्ध कंपन्या :

कंपनी कायदाच्या कलम २ (५२), सूचीबद्ध कंपनी म्हणजे कोणतीही कंपनी ज्या कोणत्याही सिक्युरिटीज कोणत्याही मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजवर सूचीबद्ध असतात.

९ ) आजारी कंपन्या :

म्हणजेच कंपनी ४ वर्षांच्या कालावधीत सरासरी निव्वळ किंमतीच्या ५०% पेक्षा जास्त तोटा; किंवा अशा परतफेडीसाठी केलेल्या लेखी मागणीनुसार सलग ३ तिमाहीत त्याच्या लेखाकर्त्यांचे कर्जफेड करण्यात अपयशी ठरले आहे अशा कंपनीला आजारी कंपनी म्हणतात.

## एकल व्यक्ती कंपनीची वैशिष्ट्ये

या कंपनीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील

i) एका भागधारकाकडून कार्यसंचालन :

एकल व्यक्ती कंपनीचे कार्यसंचालन हे कमीत-कमी एका भागधारक व्यक्तीकडून आणि एका संचालकाकडून होते. एकल व्यक्ती कंपनीची धारका अशी व्यक्ती होते की, जी व्यक्ती कंपनीच्या संरचनेनुसार व्यवसायाची कौशल्यपूर्वक हाताळणी स्वतंत्रपणे करेल आणि या अधिनियमाने सुधारणा केलेल्या अपेक्षित उद्दिष्टांची पूर्तता होईल.

ii) नामनिर्देशित व्यक्तीची नियुक्ती :

एकल व्यक्ती कंपनीचा जो एकमेव सर्वेसर्वा सदस्य आहे, त्याला नामनिर्देशित व्यक्तीची नियुक्ती करावी लागते. अशी नामनिर्देशित व्यक्ती भागधारकाच्या मृत्युनंतर, त्या कंपनीचे सर्व कामकाज नियंत्रित करू शकतो.

iii) काही विशिष्ट प्रक्रियांतून सवलत :

प्रक्रियात्मक दृष्टीने पाहिल्यास एकल व्यक्ती कंपनींना कंपनीच्या काही विपत्रातून सवलत मंजूर केलेली आहे. या सवलती सर्वसाधारणपणे खासगी मर्यादित कंपन्यांना मिळत नाही. उदा. एकल व्यक्ती कंपन्या विशेष सर्वसाधारण सभा, वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याचे बंधन किंवा सक्ती करण्यात आलेली नाही. अगदी एकल व्यक्ती कंपन्यांना अहवालांचे सादरीकरण निबंधकाकडे करण्याच्या प्रक्रियेत देखील काही सवलती देण्यात आलेल्या
आहेत.

iv) एकल व्यक्ती कंपनीबाबत स्पष्टपणे विश्लेषण :

या अधिनियमामध्ये एकल व्यक्ती कंपनीची उद्दिष्टे, हेतू या सर्वच बाबींचे तपशीलवारपणे विवेचन केले गेले आहे.

## सेवाभावी संस्था (कलम ८ )कंपनीची वैशिष्ट्ये

कलम ८ कंपनीमध्ये अशा विशिष्ट वैशिष्ट्यांचा समावेश आहे ज्या बऱ्याच प्रकारच्या कंपन्यांकडे नसतात :

१ ) सेवाभावी उद्दिष्ट्ये :

कलम ८ कंपन्या नफा मिळविण्याचे उद्दीष्ट ठेवत नाहीत. त्यांचे उद्दिष्ट पूर्णपणे सेवाभावीचे असते. विज्ञान, संस्कृती, संशोधन, खेळ, धर्म इत्यादींना प्रोत्साहन देण्याचे त्यांचे लक्ष्य आहे.

२) किमान भागभांडवल :

कलम ८ कंपन्याना इतर सर्व कंपन्यांप्रमाणे विहित किमान पेड-अप भागभांडवल आवश्यक नसते.

३) मर्यादित उत्तरदायित्व :

या कंपन्यांच्या सदस्यांचे फक्त मर्यादित उत्तरदायित्व असू शकते. त्यांचे उत्तरदायित्व कोणत्याही परिस्थितीत अमर्यादित असू शकत नाही.

४) शासकीय परवाना :

अशा कंपन्या केंद्रसरकारचा परवाना असेल तरच कार्य करू शकतात. सरकार हा परवाना मागे देखील घेऊ शकते.

५) विशेषाधिकार

या कंपन्या सेवाभावी उद्दीष्टे धारण करीत असल्याने कंपनी कायद्याने त्यांना अनेक फायदे व सूट दिली आहे.

६) सदस्य म्हणून फर्म :

व्यक्ती आणि व्यक्तींच्या संघटनाव्यतिरिक्त, कलम ८ फर्मला देखील या कंपन्यांचे सदस्य बनू देते.

---

संदर्भ ग्रंथ :-


- कंपनी कायद्याचे घटक -I -डॉ. गोविंद डुंबरे ,डॉ. शिवाजी टाकळकर ,डॉ. आशा कदम-पेंढारी
- कंपनी कायद्याची मुलतत्वे – प्रा. सुरेश भिरूड आणि इतर
- कंपनी कायद्याची मुलतत्वे(भाग १) – डॉ. धीरज झाल्टे आणि इतर
- Elements of Company Law - Sultan Chand & Sons
- Elements of Company Law - N.D. Kapoor
- Elements Of Company Law- Prof. Prakash N. Chaudhary